१३

## MAHARASHTRA ACT No. XVI OF 1986.

## THE BOMBAY RENTS, HOTEL AND LODGING HOUSE RATES, CONTROL (EXTENSION OF DURATION) ACT, 1986.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २१ फेब्रुवारी १९८६ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XVI OF 1986.

## AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE BOMBAY RENTS, HOTEL AND LOGING HOUSE RATES CONTROL ACT, 1947.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २८ फेब्रुवारी १९८६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६

मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याची मुदत वाढविण्यासाठी अधिनियम.

१९४७ चा मुंबई ५७. ज्याअर्थी, 'मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७' याची मुदत वाढविणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या छत्तिसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास 'मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण (मुदत वाढविणे) अधिनियम, १९८६' असे म्हणता येईल.

त १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७ च्या कलम ३ ची सुधारणा.

२. 'मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७' याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (२) मध्ये "१९८६" या आकड्याऐवजी "१९९१" हा आकडा दाखल करण्यात येईल. १९४७ चा मुंबई ५७.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.